उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील "मागणी क्रमांक : डब्ल्यु-१, २०४९ व्याज प्रदान" आणि "मागणी क्रमांक डब्ल्यु-४, २२३०", कामगार व सेवायोजन हया कार्यक्रमावरील खर्च (Scheme) व अनिवार्य खर्च (Obligatory) करण्याकरीता मुख्य लेखाशिर्ष सन २०१७-१८ या वित्तीय वर्षापासून कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखाली उघडण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,

शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२४११/२०१५/प्र.क्र. १३०/व्यशि-२,

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- १५ फेब्रुवारी,२०१८

<u>वाचावे</u> :- (१) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय, क्रमांक : कौविउ-२०१५/ प्र.क्र. १२२/रोस्वरो-१, दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५.

(२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय, क्रमांक : कौविउ-२०१५/ प्र.क्र. १९०/प्रशा-१, दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५.

(३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२४११/२०१५/ प्र.क्र. १३०/व्यशि-२,दिनांक ७ जुलै, २०१६.

(४) प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक : ख.वि./चा-१/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/यूओआर - ११९/ २०१६-१७/१७६६, दिनांक २४.०१.२०१७.

<u>प्रस्तावना :-</u>

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, या नवनिर्मित विभागामार्फत राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अनुषंगाने, "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान" राबविण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक (१) चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच, सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ९.३ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेले, "व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय" मधील मंजूर पदे व कार्यरत अधिकारी व कर्मचारी अर्थसंकल्पीय तरतूदीसह, यथास्थिती संचालनालयाच्या आस्थापनेची कामे पाहणा-या उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व संबंधित कार्यासने, मंजूर पदे व कार्यरत अधिकारी/कर्मचारी वर्ग, अर्थसंकल्पीय तरतूदीसह नवनिर्मित कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखाली आणण्याकरिता संदर्भाधीन क्रमांक (२) चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तसेच, सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई व त्यांच्या अधिनस्त कार्यालयाकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून निधि अर्थसंकल्पित करण्यासाठी "मागणी क्रमांक :- डब्ल्यू-३,२२०३, तंत्रशिक्षण व मागणी क्रमांक:- डब्ल्यू-४,२२३०,

कामगार व सेवायोजन" या योजनेअंतर्गत (PLAN) मुख्य लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित तरतूद कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखाली आणण्यासाठी संदर्भाधिन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये नविन लेखाशिर्ष व उपशिर्ष उघडण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील "मागणी क्रमांक:-डब्ल्यू-४,२२३०, कामगार व सेवायोजन (००२) (३२) उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना पुरस्कार (२२३०५६५९) तसेच मागणी क्रमांक:- डब्ल्यू-१,२०४९, व्याज प्रदान ०३,अल्पबचत भविष्य निर्वाह निधी इत्यादी वरील व्याज, १०४ राज्य भविष्य निर्वाह निधीवरील व्याज इतर संकिर्ण भविष्यनिर्वाह निधी, (००) (०४) अनुदानित अशासकीय व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भविष्य निर्वाह निधीवरील व्याज (२०४९२२७३),४५ व्याज ही लेखाशिर्षे कौशल्य विकास विभागाच्या अधिपत्याखाली आणण्याचे राहून गेले होते.त्यानुषंगाने सदर योजनांसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून निधी अर्थसंकल्पीत करण्यासाठी, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सदर लेखाशिर्षाऐवजी कौशल्य विकास व उद्योजकता विभागासाठी नवीन लेखाशिर्षे व उपशिर्षे उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन आता याद्वारे, कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखाली , मागणी क्रमांक:- झेडए-१, २२३०, कामगार व सेवायोजन आणि मागणी क्रमांक :- झेडए-१, *२०४९*, व्याज प्रदान, या लेखाशिर्षाखाली खालीलप्रमाणे नवीन लेखाशिर्षे व उपशिर्षे उघडण्यास मान्यता देत आहे:-

१) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग मागणी क्रमांक:- झेडए-१.
 २२३०,कामगार व सेवायोजन
 ०३,प्रशिक्षण
 ००३,कारागिर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण
 ०२, कारागिरांचे तांत्रिक व व्यवसायिक प्रशिक्षण
 (०२)(१४) उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना पुरस्कार (२२३० A ३१६).

२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग मागणी क्रमांक:- झेडए-१.
 २०४९, व्याज प्रदान
 ०३,अल्पबचत भविष्यनिर्वाह निधी इत्यादीवरील व्याज
 १०४ राज्य भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज इतर संकीर्ण भविष्यनिर्वाह निधी व्याज
 (००)(०१) अनुदानित अशासकीय व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी वरील व्याज (२०४९ २५८७).

२. सदर शासन निर्णय, प्रधान महालेखाकार, (लेखा व हकदारी)-१ महाराष्ट्र, मुंबई कार्यालयाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ख.वि./चा-१/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/युओआर-११९/२०१६-१७/१७६६ दि.२४.०१.२०१७ व वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्र.३०/अर्थ-१८ दि.१७.०१.२०१८ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०२१४१६४०२३७२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac3054927f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2018.02.16 13:07:01 +05'30'

(स.दि.खरात)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
४. आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.
५. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
६. निवासी लेखाधिकारी, लेखा व अधिदान कार्यालय, मुंबई.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, कफ परेड, मुंबई.
८. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
९. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, वांद्रे मुंबई.
१०. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, पुणे/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद.
११. नियोजन विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई.
१२. उपसचिव, कौशल्य व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. कार्यासन अधिकारी, कार्यासने प्रशा-१, रोस्वरो-२, व्यशि-१,व्यशि-२,व्यशि-३,व्यशि-४, व्यशि-५ कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (व्यशि-२), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रतिलिपी, माहितीस्तव सादर.

१. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. मा. सभापती, विधानपरिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.